**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री.एल एच लांडे यांच्यामार्फत पुढे सुरु</u>**

५. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल बाळासाहेब व आरोपी यांच्यामध्ये उस तोडी संदर्भात टॅक्टर लावणेबाबत कोणताही लेखी करार झाला नव्हता. आरोपी अर्जुन फूंदे हा उस तोड मुकादम असलेबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे उपलब्ध आहे. तो मी न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे. आज रोजी माझ्याकडे सदरचा कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. माझे वडिल काहिही शिकलेले नाहीत. मला एक भाउ असून तो २१ वर्ष वयाचा आहे. मला बहिण नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझा भाउ व आई वडिल एकत्र राहतो व आमच्या कुटूंबाचा कर्ता पुरुष माझे वडिल आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कुटूंबाच्या आर्थिक व सामाजिक कामे माझे वडिल करतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल शरीराने धडधाकट असून त्यांची मानसिक परिस्थीती चांगली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अज्ञान असल्यामूळे मला माझ्या वडिलांनी टॅक्टर विषयी कोणाला किती पैसे दिले व काय व्यवहार केले याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला रकमेबाबत माहिती नसल्यामूळे मी माझ्या फिर्यादीमध्ये सुध्दा रकमेबाबत काहिही लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझ्या वडिलांमध्ये झालेल्या आर्थिक व्यवहाराची संपूर्ण माहिती वडिलांनाच आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांची आजही आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यांची कोणतीही तक्रार नसल्यामूळे त्यांनी पोलीस स्टेशन किंवा न्यायालयामध्ये आरोपी विरुध्द तक्रार दाखल केली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की माझ्या वडिलांनी आरोपी विरुध्द तक्रार दाखल केली आहे. मला माझ्या वडिलांनी आरोपी विरुध्द तक्रार दाखल केल्याची तारीख सांगता येणार नाही. माझ्या वडिलांनी आरोपी विरुध्द न्यायालयामध्ये तक्रार दाखल केली. माझ्या वडिलांनी दाखल केलेल्या तक्रारीची प्रत माझ्याकडे सध्या उपलब्ध नाही. माझ्या वडिलांनी शेवगाव येथील न्यायालयामध्ये त्यांच्या वकिल साहेबांमार्फत तक्रार दाखल केली. माझे वडिल तक्रार दाखल करण्यासाठी न्यायालयामध्ये प्रत्यक्ष आले होते. सदरच्या तक्रारीची कामकाज सद्या प्रलंबित आहे. माझ्या वडिलांनी अॅड. गरुड यांच्यामार्फत तक्रार दाखल केली. माझ्या वडिलांचा शपथेवर जबाब वकिल साहेबांनी न्यायालयामध्ये घेतला होता. माझ्या वडिलांच्या जबाबाची नक्कल माझ्याकडे नाही. मी सदरची नक्कल न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांना खा-या खोटयाचे ज्ञान आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेली फिर्याद माझे वडिल सुध्दा दाखल करु शकले असते. घटना

माझ्यासोबत घडलेली आहे म्हणून मी फिर्याद दाखल केली आहे. आमचे ट्रॅक्टर पासिंग केलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, चापडगाव येथील बस स्थानकावर नेहमी लोकांची गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, एखादी घटना घडल्यास तेथे २५ ते ५० माणसं सहज जमा होतात.

प्रश्न तुम्ही दि. ०९.०९.२०२२ रोजी आरोपी विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली नाही ?

उत्तर त्यांनी तक्रार घेतली नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या ताब्यातून मी सांगितलेला ट्रॅक्टर आरोपी कधीही घेउन गेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा व माझा कोणताही संबंध आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून पैसे उकळण्यासाठी व त्याला त्रास व्हावा म्हणून मी त्याच्याविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

RAMESH RAOJI BHADRE
Digitally signed by RAMESH RAOJI BHADRE
Date: 2025.10.30 16:49:10 +0530

दि. ३०/१०/२०२५

(आर. आर. भद्रे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
शेवगाव